# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३,महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी – ३०२३३४७६, २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१ फॅक्स - २२६९०००७.

E-mail : desk16@dtemaharashtra.gov.in Internet :www.dtemaharashtra.gov.in


क्रमांक : १६/आस्था/संकीर्ण/२०१७/शा२६०७

दिनांक : १० नोव्हें २०१७

प्रति,

सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर

**विषय : महाराष्ट्र राज्यातील सर्व विद्यापीठ व महाविद्यालयातील विद्यार्थी – विद्यार्थीनींच्या सुरक्षेबाबत उपाययोजना करणे संदर्भात.**

उपरोक्त विषयाबाबतचे उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे पत्र क्रमांक संकिर्ण-१११९/प्र.क्र.७९/१७/समन्वय, दिनांक २३.१०.२०१७ जोडत आहे.

मा. राज्यमंत्री (गृहनिर्माण व उच्च व तंत्र शिक्षण) यांच्या पत्राच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, आपल्या अधिपत्याखालील संस्थेमधील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेकरिता पुरेशा उपाययोजना करण्यासाठी योग्य ते निर्देश संबंधित संस्थांना देण्यांत येवून, त्यानुसार संबंधित संस्था / कार्यालयाकडून करण्यांत आलेल्या कार्यवाहीचा अहवाल या संचालनालयास तात्काळ पाठवावा जेणेकरून शासनास सादर करणे शक्य होईल.

सहसंचालक तंत्रशिक्षण
प्रादेशिक कार्यालय, नागपूर
आवक क्रमांक 7932
दिनांक 17 NOV 2017

**( सुचित्रा रणदिवे )**
**सहाय्यक संचालक,**
**तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई**

---

पृ.क्र.तंशिस/प्राकाना/शैवि/2017/ 3161
सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, नागपूर
दिनांकः- 22 NOV 2017

प्रति,

प्राचार्य,
सर्व पदवी, पदव्युत्तर पदवी व पदवीका संस्था,
नागपूर विभाग, नागपूर

यांना कळविण्यात येते की, उपरोक्त पत्रासोबत मा. राज्यमंत्री उच्च व तंत्रशिक्षण विभाग, म.रा., मुंबई यांनी दिलेल्या विद्यापीठ व महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थीनींच्या सुरक्षेबाबत उपाययोजना करणेबाबतचे पत्र सोबत जोडलेले आहे. सदर उपाययोजनेनुसार कार्यवाही करून त्याबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपूर

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३,महापालिका ,मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी – ३०२३३४७६, २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१ फॅक्स - २२६९०००७.

E-mail : desk16@dtemaharashtra.gov.in Internet :www.dtemaharashtra.gov.in


क्रमांक : १६/आस्था/संकीर्ण/२०१७/शा२६०७

दिनांक : 10 NOV 2017

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर

**विषय : महाराष्ट्र राज्यातील सर्व विद्यापीठ व महाविद्यालयातील विद्यार्थी – विद्यार्थीनींच्या सुरक्षेबाबत उपाययोजना करणे संदर्भात.**

उपरोक्त विषयाबाबतचे उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे पत्र क्रमांक संकिर्ण-१११११/प्र.क्र.७९/१७/समन्वय, दिनांक २३.१०.२०१७ जोडत आहे.

मा. राज्यमंत्री (गृहनिर्माण व उच्च व तंत्र शिक्षण) यांच्या पत्राच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, आपल्या अधिपत्याखालील संस्थेमधील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेकरिता पुरेशा उपाययोजना करण्यासाठी योग्य ते निर्देश संबंधित संस्थांना देण्यांत येवून, त्यानूसार संबंधित संस्था / कार्यालयाकडून करण्यांत आलेल्या कार्यवाहीचा अहवाल या संचालनालयास तात्काळ पाठवावा जेणेकरून शासनास सादर करणे शक्य होईल.

(सही)

( सुचित्रा रणदिवे )
सहाय्यक संचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

सहसंचालक तंत्रशिक्षण
प्रादेशिक कार्यालय, नागपूर
आवक क्रमांक ....7932....
दिनांक ....17 NOV 2017

सर्व संस्थांना आ.का. सादर / संबंधित शिक्षण ...
20.11

महाराष्ट्र शासन

क्र. संकिर्ण-११११ /प्र.क्र.७९/१७ /समन्वय
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई – 400 032.
दिनांक :- २३ ऑक्टोबर, २०१७

प्रति,

१ ) विभागातील सह सचिव ( विद्यापीठ शिक्षण ) उप सचिव ( महाविद्यालयीन शिक्षण/तंत्र शिक्षण. /कला / ग्रंथालये) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२

२) संचालक (~~उच्च शिक्षण~~ / तंत्र शिक्षण / ~~कला~~ / ~~ग्रंथालय~~) महाराष्ट्र राज्य.

विषय :- महाराष्ट्र राज्यातील सर्व विद्यापीठ व महाविद्यालयातील विद्यार्थी - विद्यार्थीनींच्या सुरक्षेबाबत उपाययोजना करणे संदर्भात.

मा.श्री.रविंद्र वायकर, राज्यमंत्री, गृहनिर्माण व उच्च व तंत्र शिक्षण यांचे दि.१९.९.२०१७ चे पत्र सोबत पाठविण्यात येत आहे.

२. सदर प्रकरणी महाविद्यालयातील विद्यार्थ्यावर होणा-या रॅगिंग, दहशत, लैंगीक शोषण, प्रसंगी खुन इ. गंभीर घटनांमध्ये वाढ झाल्याचे वर्तमानपत्र अथवा इलेक्ट्रॉनिक मिडीयाच्या बातम्यांतून कळते. विद्यापीठ व महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांची सुरक्षा ही संबंधित शैक्षणिक संस्थेची असल्याने शैक्षणिक संस्थांचा, शैक्षणिक परिसर व वसतिगृहे, ग्रंथालय, उपहारगृहे इत्यादी मध्ये सुरक्षेच्या पुरेशा उपाययोजना करण्यासाठी शैक्षणिक परिसरात सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविणे, सर्व विद्यार्थ्यांना ओळखपत्र लावून महाविद्यालयात प्रवेश बंधनकारक करणे, योग्य ठिकाणी सुरक्षा रक्षकाची नियुक्ती करणे इत्यादि बाबींचा अवलंब करणेबाबत मा.राज्यमंत्री महोदयांनी वरील दि.१९.९.२०१७ च्या पत्रान्वये मा.राज्यमंत्री, (गृहनिर्माण व उच्च व तंत्र शिक्षण) यांनी आदेशीत केले आहे. तरी सदर प्रकरणी कार्यवाही होण्यासाठी आपल्या अधिपत्याखालील सर्व संबंधीतांना कळविण्यात यावे व त्याचा अनुपालन अहवाल शासनास सादर करण्यात यावा, अशी विनंती आहे.

आपला विश्वासू,

( रा.वि.जाधव )
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

जिमाजा.क्र. राम/गृनि.,उ. व तं.शि./ ७११ /२०१७

सं.क्र.रामं ६०१७/समन्वय
११/१०/१७

राज्यमंत्री
महाराष्ट्र राज्य

अ.मु.स.
उच्च व तंत्र शिक्षण
यांचे कार्यालय
क्र. 849-799
दि. 26-9-17


रविंद्र दत्ताराम वायकर
पालकमंत्री - रत्नागिरी जिल्हा

राज्यमंत्री
गृहनिर्माण, उच्च व तंत्र शिक्षण
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

*www.maharashtra.gov.in*
ई-मेल : *stateminister.housing@gmail.com*


दिनांक : १९ सप्टेंबर,२०१७

विषय : महाराष्ट्र राज्यातील सर्व विद्यापीठ व महाविद्यालयातील विद्यार्थी-
विद्यार्थीनींच्या सुरक्षेबाबत उपाययोजना करणे संदर्भात... .. ..

राज्यात दिवसेंदिवस विद्यार्थ्यांचा उच्च शिक्षणाकडे कल वाढत असून, विद्यार्थी मोठया संख्येने राज्यातील विद्यापीठे व महाविद्यालयांमध्ये अभ्यासक्रमांना विविध अभ्यासक्रमांना प्रवेशित होत आहेत. नवनविन अभ्यासक्रमांच्या मागण्यांमुळे नविन अभ्यासक्रमांच्या अतिरिक्त तुकडया अथवा नविन महाविद्यालयांची संख्या देखील झपाटयाने वाढत आहे.

अलीकडे महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांच्या सुरक्षे संदर्भात वर्तमानपत्रातून अथवा इलेक्ट्रॉनिक मिडीयातून विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या रॅगिंग, दहशत, लैंगीक शोषण, प्रसंगी खुन इ. गंभीर घटनांमध्ये वाढ झाल्याचे बातम्यांतून कळते. यामुळे विविध विद्यापीठे व महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न देखिल ऐरणीवर आला आहे. विद्यापीठे व महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांची सुरक्षा ही संबधित शैक्षणिक संस्थेच्या प्रशासनाची आहे परंतु कांही शैक्षणिक संस्थांच्या शैक्षणिक परिसर व वसतिगृहे,ग्रंथालय,उपहारगृह इ.मध्ये सुरक्षेच्या पुरेशा उपाययोजना केल्याचे आढळून येत नाही. त्यामुळे दिवसेंदिवस वरिल घटनांमध्ये वाढ होत आहे. त्याकरिता सर्व संबधित विद्यापीठे व महाविद्यालयांनी विद्यार्थी व विद्यार्थीनींच्या सुरक्षिततेच्या उपाययोजना म्हणून संपुर्ण शैक्षणिक परिसरात सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविणे,सर्व विद्यार्थ्यांना ओळखपत्र लावून महाविद्यालयात प्रवेश बंधनकारक करणे, योग्य ठिकाणी सुरक्षा रक्षकाची नियुक्ती करणे इत्यादि बाबींचा अवलंब करणे अत्यंत आवश्यक आहे.

शैक्षणिक संस्थांतील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न अत्यंत संवेदनशील असून त्यास गांभीर्याने घेणे गरजेचे असल्याने राज्यातील सर्व विद्यापीठे व महाविद्यालयांना विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत पुरेशा व योग्य उपाययोजना करण्याबाबत कळवून त्याचा अनुपालन अहवाल एक महिन्यात शासनास सादर करण्याबाबत सुचना आपल्यास्तरावरुन निर्गमित कराव्यात व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सत्वर मला अवलोकनार्थ सादर करावा.

2619
DS/B
JS/K
समन्वय

(रविंद्र दत्ताराम वायकर)

प्रति,

अवर मुख्य सचिव,
उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
मत्रालय, मुंबई-४०० ०३२